# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

:: प्रधान कार्यालय ::
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९

## नविन रिक्षा खरेदीसाठीचे
## वाहन कर्ज धोरण

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## नविन रिक्षा खरेदीसाठीचे वाहन कर्ज धोरण

**पात्रता :-**

१) १८ वर्षे व यावरील सज्ञान, किमान ८ वी पास, (मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक) भारतीय नागरीक, मुंबईतील रहिवासी असणे आवश्यक राहील.
२) वाहन परवाना तसेच परमीट धारक असणे आवश्यक.
३) बँकेचे नाममात्र सभासद असलेल्या व्यक्तीस कर्ज पुरवठा केला जाईल.
४) सुशिक्षित बेरोजगार किंवा गिरणी कामगार किंवा त्यांचे अपत्य असणे आवश्यक राहील.
५) उपरोक्त कर्ज पुरवठा केवळ नविन रिक्षा खरेदी साठीच केला जाईल. जुन्या (सेकंड हॅन्ड) वाहनासाठी कर्ज पुरवठा केला जाणार नाही.
६) कर्जासाठी २ सक्षम जामिनदार देणे आवश्यक राहील.

**कर्ज मर्यादा :-** वाहनाचे एकूण किंमतीचे (मुळ किंमत + रजिस्ट्रेशन चार्जेस + सी.एन.जी कीट (वापरणार असल्यास बसविणेचा खर्च ) + मीटर खर्च + इंन्शुरन्स खर्च (प्रथम वर्षाकरीता) + (पासिंग चार्जेस) यांचे ९०% इतका कर्ज पुरवठा केला जाईल.

**व्याजदर :-** प्रचलीत व्याजदर ११% इतका आहे.

**प्रोसेसिंग फी :-** रु.१०००/- मात्र + सर्व्हिस टॅक्स

**परतफेड कालावधी :-** ३६ महिने

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१) अर्जदार व जामिनदार यांची के.वाय.सी. नुसारची कागदपत्रे.
२) ड्रायव्हिंग लायसन्स परमीट ३) बेरोजगार असलेसंबंधी डिक्लरेशन व गिरणी कामगार असले संबंधी पुरावे.
३) वाहनांचे, अधिकृत विक्रेताकडील, वाहन किंमतीचे कोटेशन

उपरोक्त कर्जासाठी कर्ज मंजूरी, कर्ज उचल, इत्यादी सर्व प्रक्रिया, बँकेच्या प्रचलित वाहनतारण कर्ज धोरणानुसार राहील.

Z:\Vaishu\karj dhoran 2016\navin rikshaw karedi vahan- karj dhoran.doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## नविन रिक्षा खरेदीसाठी वाहन कर्ज धोरण अटी/ शर्ती

१. सदरचे कर्ज व्यावसायिक प्रवासी वापरासाठी परवाना असलेल्या, तसेच नविन वाहनांच्या खरेदीसाठी कर्ज पुरवठा केला जाईल. जुन्या वाहनांसाठी (सेकंड हँड) कर्ज पुरवठा केला जाणार नाही. कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुन्यात अर्ज करावा लागेल.

२. बँकेच्या नाममात्र / नामधारी सभासद असलेल्या व्यक्तिस कर्ज पुरवठा केला जाईल. (कर्ज मागणी करणा-या व्यक्तिस व जामिनदारास नामधारी / नाममात्र सभासद (Nominal Member ) व्हावे लागेल.)

३. कर्जासाठी दोन लायक जामिनदार उपलब्ध करुन द्यावे लागतील. कर्जदार / जामिनदार प्राप्तीकर / रिर्टन भरणारे लायक असावेत. (मागील तीन वर्षाचे विवरण पत्राची झेरॉक्स प्रती सादर कराव्या लागतील.) सदर जामिनदारापैकी किमान एक जामिनदार आयकरप्राप्त पगारदार असावा.

४. कर्जासाठी सभासदाचे प्रथम स्वगुंतवणूकीची रक्कम १०% बँकेत भरणा करावी लागेल. सदरची रक्कम प्राप्त झालेनंतर मंजूर कर्ज मिळून एकूण रक्कम वाहन पुरवठादारास परस्पर अदा केली जाईल. तथापि परतफेड कालावधी ३ वर्षे राहील परतफेडीचे हप्ते, दरमहाव्याजासह ( Daily Reduce Balance ) पध्दतीने निश्चित केले जातील.

५. कर्जदाराने खरेदी केलेल्या वाहनाचे नजरगहाणखत बँकेच्या नावाने करुन द्यावे लागेल.

६. कर्जदाराने खरेदी केलेल्या वाहनाचा संपूर्ण किंमतीचा विमा बँकेने वेळोवेळी Tie Up केलेल्या जनरल इन्शुरन्स कंपनीकडून बँक व कर्जदार यांचे संयुक्त नावाने कर्जदाराने प्रथम वर्ष वगळता स्वखर्चाने उतरवावा लागेल. विमा पॉलीसी बँकेच्या ताब्यात राहील.

७. कर्जदाराने खरेदी केलेल्या वाहनाची कर्जदार व बँक यांचे संयुक्त नावे नोंद प्रादेशिक परिवहन कचेरी (आर.टी.ओ.) कडे करावी लागेल.

८. कर्जावरील व्याजदरामध्ये वेळोवेळी होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहातील.

९. वाहन सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी कर्जदाराची राहील. सदरचे वाहन तपासणीसाठी दर सहामाहीस बँकेत उपलब्ध करुन द्यावे लागेल. त्याची जबाबदारी कर्जदारावर राहील.

१०. कर्जदाराकडून ₹.१,०००/- अधिक सर्व्हीस टॅक्स इतकी विना परतावा (Non Refundable) कर्ज प्रस्ताव हाताळणी शुल्क ( Processing Fees ) घ्यावी लागेल.

११. कर्जदारास वाहन चालविणेचा पक्का परवाना तसेच पुरेसा अनुभव असावा.

१२. कर्जदार अन्य वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

१३. कर्ज मंजूर/ अदा करतांना कर्जदाराची स्थावर व इतर मालमत्ता विचारात घेवून कर्ज रक्कम मंजूर/ अदा केली जाईल.

१४. कर्ज अटीमध्ये बदल करणे, जादा अटींचा समावेश करणे अथवा रद्द करणे याबाबतचा अधिकार बँकेस राहील. कर्ज अटीमध्ये होणारे बदल कर्जदारावर बंधनकारक राहतील.

१५. दरमहा कर्ज हप्ता देय तारखेपर्यंत भरला नाही तर बँक कर्ज धोरणानुसार लेट पेमेंट चार्जेस आकारले जातील.

१६. कर्जाचे सलग तीन हप्ते थकीत झाल्यास वाहन जप्त करणेचा बँकेस अधिकार राहील. वाहन जप्तीसाठी येणारा अनुषंगिक खर्च कर्जदाराच्या खात्यास नावे टाकला जाईल/अथवा वसुल केला जाईल.

१७. कोणतेही कारण न देता अथवा एखाद्या अटीची पूर्तता न केल्यास कर्ज नाकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

१८. कर्जदाराने अधिकृत विक्रेत्याकडील वाहनाच्या किंमतीचे कोटेशन सादर करावे लागेल.

१९. कर्जदार बँकेच्या कार्यक्षेत्रातील (मुंबई / बृहन्मुंबई) वास्तव्य असणारा असला पाहिजे. यासाठी KYC ची पूर्तता करावी लागेल.

२०. कर्जदार ज्या शाखेतून कर्जाची उचल घेणार आहे तेथे बचत खाते असणे आवश्यक आहे.

२१. कर्जदाराने उतरविलेल्या विमा पॉलीसीचे हप्ते भरणे, मुदत संपताच नुतनीकरण करुन घेणे यांची सर्वस्वी जबाबदारी कर्जदाराची राहील. नुतनीकरण करुन न घेतल्यास बँक विमा पॉलिसीचे नुतनीकरण करुन घेईल व त्याबाबतचा येणारा खर्च कर्जदाराकडून वसुल केला जाईल. तसेच कर्जदारावर संबंधीत कर विहीत वेळेत भरण्याची जबाबदारी राहील.

२२. विमा पॉलिसी, वाहनाची डुप्लीकेट चावी संबधित बँकेच्या शाखेच्या कस्टडीत राहील.

२३. कर्ज मागणी करणाऱ्या कर्जदाराची कर्ज मागणी पूर्वी किंवा कर्ज मागणी नंतर प्रत्यक्ष मुलाखत घेवून पात्रता ठरविली जाईल.

२४. सदरचे कर्ज वैयक्तिक कर्जदारांना दिले जाणार आहे. खाजगी वाहतूक कंपनीना कर्ज दिले जाणार नाही.

२५. सदर कर्जातून घेतलेल्या वाहनाचा गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास वाहन जप्त करण्याचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

२६. सदर वाहनांवर "मुंबै बँकेच्या सौजन्याने" असा शेरा लिहिलेला असावा.

२७. दैनंदिन प्राप्त होणा-या उत्पन्नातील कमीत कमी ६०% इतकी रक्कम बँकेतील बचत खात्यावर जमा करणे कर्जदारावर बंधनकारक राहील.

२८. अर्जदार / सहअर्जदारांचा कर्ज हप्ता जरी ECS अथवा [illegible] /खात्यावरुन वर्ग होणार असला तरी १२ कोरे आगाऊ सहया केलेले धनादेश द्यावे लागतील.

Z:\Vaishu\karj dhoran 2016\navin rikshaw karedi vahan- karj dhoran.doc